27 JUL 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जाणिवासमृद्ध संख्याशास्त्रज्ञ

**जगप्रसिद्ध भारतीय संख्याशास्त्रज्ञ डॉ. पांडुरंग वासुदेव सुखात्मे यांची आज, गुरुवारी (२७ जुलै) जयंती. या निमित्ताने त्यांचे जीवनकार्य विशद करणारा लेख.**

▸ **डॉ. दिगंबर शिर्के, कुलगुरू,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



**डॉ. पांडुरंग सुखात्मे**

स्वातंत्र्यपूर्व काळात या देशातील एक युवा संशोधक परदेशातील विद्यापीठातून आपल्या शैक्षणिक कारकीर्दीमधली अत्युच्च पदवी प्राप्त करतो आणि भारतात परततो. येथे आल्यानंतर एका नामांकित विद्यापीठात प्राध्यापकाच्या जागेसाठी मुलाखत देतो. मुलाखतीमध्ये कुलगुरूंनी विचारलेल्या एका प्रश्नाचे उत्तर समाधानकारक देता आले नाही, म्हणून आयुष्यभर त्या प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी कार्य करत राहतो. हा संशोधक म्हणजे डॉ. पांडुरंग वासुदेव सुखात्मे. लंडनमधून पीएच. डी. आणि डी.एस्सी. या पदव्या त्यांनी मिळविल्या. बनारस हिंदू विश्वविद्यालयात मुलाखत देण्यासाठी गेले असता त्यांना तत्कालीन कुलगुरू पंडित मदनमोहन मालवीय यांनी विचारलं, "आपल्या ज्ञानाचा या देशातील गरिबी आणि दारिद्र्य दूर करण्यासाठी कसा उपयोग कराल?" या प्रश्नाचे उत्तर आजसुद्धा अभ्यासक्रमामध्ये अभावानेच मिळेल. डॉ. सुखात्मे यांना या अभ्यासक्रमाबाहेरच्या प्रश्नाने अस्वस्थ केले आणि त्यांनी त्या विद्यापीठात रुजू होण्याऐवजी आयुष्यभर या प्रश्नाच्या सोडवणुकीलाच वाहून घेतले.

डॉ. पांडुरंग वासुदेव सुखात्मे यांचा जन्म सातारा जिल्ह्यातील बुध येथे २७ जुलै १९११ रोजी झाला. पुण्यातील भावे हायस्कूलमध्ये त्यांचे शालेय शिक्षण झाले, तर १९३२ मध्ये फर्ग्युसन कॉलेजमधून गणित या विषयात त्यांनी पदवी प्राप्त केली. पुढे ते उच्चशिक्षणासाठी युनिव्हर्सिटी कॉलेज ऑफ लंडन येथे गेले. तेथून त्यांनी १९३६ मध्ये पीएच.डी. आणि १९३९ मध्ये डी.एस्सी. अशा अत्युच्च पदव्या प्राप्त केल्या. त्यांना प्रा. आर. ए. फिशर, प्रा. ई. एस. पिअर्सन आणि प्रा. जे. न्यूमन हे त्या वेळचे नामांकित शिक्षक आणि संशोधक मार्गदर्शक म्हणून लाभले. भारतात परतल्यानंतर डॉ. सुखात्मे कोलकाता येथील अखिल भारतीय स्वास्थ्य व सार्वजनिक आरोग्य या संस्थेत वैद्यकीय पदवीधरांना शिकविण्यासाठी गेले. १९४० ते १९५१ या कालावधीत ते संख्याशास्त्रज्ञ व त्यानंतर सांख्यिकी सल्लागार म्हणून इंडियन कौन्सिल ऑफ ॲग्रीकल्चर रिसर्च, दिल्ली या संस्थेमध्ये कार्यरत होते. व्यावहारिक उपयोगासाठी नमुना निवड पाहणी आणि त्यासाठी आवश्यक पद्धती विकसित करण्यामध्ये त्यांनी दिलेले योगदान आज जागतिक स्तरावरही मान्यताप्राप्त आहे. १९५२ ते १९७० या काळात ते रोममधील फूड अँड ॲग्रीकल्चरल ऑर्गनायझेशन (FAO) या संस्थेचे प्रमुख म्हणून कार्यरत राहिले.

डॉ. सुखात्मे यांनी आहारतज्ज्ञ म्हणूनही जागतिक लौकिक प्राप्त केला. संख्याशास्त्राचे शिक्षण भारतात सुरू करण्यातसुद्धा त्यांचा मोलाचा वाटा आहे. मुंबई विद्यापीठात संख्याशास्त्र विभाग सुरू करण्यामध्ये त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात आरोग्यशास्त्र प्रशाला सुरू करण्यामध्येही त्यांचे योगदान आहे. संशोधन आणि प्रशिक्षण या दोन गोष्टी संख्याशास्त्रामध्ये अतिशय महत्त्वाच्या असतात आणि त्या दोन्ही गोष्टी सोबतच केल्या पाहिजेत, अशी त्यांची धारणा राहिली. मात्र, आजही हे उद्दिष्ट पूर्णांशाने साध्य झाले आहे, असे दिसत नाही. शास्त्रीय पद्धती वापरून शेतीचे उत्पन्न तसेच सागरी माशांच्या उत्पन्नाचे अंदाज बांधण्याचे तंत्र डॉ. सुखात्मे यांनी विकसित केले. स्वच्छ व सुरक्षित पिण्याचे पाणी आणि रोगप्रतिबंधासाठी स्वतःची आणि परिसराची स्वच्छता राखणे किंवा ती राखण्याचे नियम ही सामाजिक आरोग्याच्या दृष्टीने फार महत्त्वाची बाब आहे. या दोन्ही गोष्टी विचारात घेऊन डॉ. सुखात्मे यांनी ग्रामविकासासाठी विविध कार्यक्रम राबवले.

दारिद्र्य निर्मूलन, पोषक आहार, पशुआहार, शेती आणि सागरी उत्पन्न या क्षेत्रामध्ये त्यांनी दिलेले योगदान आजही जागतिक स्तरावर उल्लेखनीय मानले जाते. त्यांच्या या बहुविद्याशाखीय योगदानाबद्दल भारत सरकारने त्यांचा 'पद्मविभूषण' पुरस्कार प्रदान करून गौरव केला आहे. संख्याशास्त्रातील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील विविध सन्मानांचेही ते मानकरी आहेत.

शिवाजी विद्यापीठाच्या संख्याशास्त्र अधिविभागाने २०११ मध्ये डॉ. सुखात्मे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त त्यांच्या नावे विद्यार्थ्यांसाठी एक पुरस्कार सुस्थापित केला. या पुरस्कारासाठी लागणारी रक्कम शिवाजी विद्यापीठांतर्गत कार्यरत संख्याशास्त्र विषयाच्या शिक्षकांनी दिली.

आजच्या विदा विज्ञानाच्या काळात संख्याशास्त्राचा अचूक वापर ही अनिवार्य बाब आहे. समाजाच्या विकासासाठी संख्याशास्त्राचा कसा वापर केला पाहिजे, याचा वस्तुपाठ डॉ. सुखात्मे यांनी घालून दिला आहे. एकविसाव्या शतकात संगणक वापरामुळे उपलब्ध होणाऱ्या प्रचंड संख्यात्मक माहितीचे योग्य विश्लेषण करून त्याचा उपयोग देशाच्या विकासात्मक कार्यासाठी करण्याची मोठी गरज आहे. आजघडीला विदा उपलब्धता ही समस्या नाहीच, तर त्या विदेचे योग्य विश्लेषण करण्याचेच मोठे आव्हान आहे. हे आव्हान आजच्या संख्याशास्त्रज्ञांनी पेलले पाहिजे आणि या देशातील गरिबी, बेरोजगारी, अज्ञान, भूक आणि अनारोग्य आदी समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करणे आणि शिक्षकांनीही त्या दृष्टीने विद्यार्थी व संशोधक जाणीवपूर्वक घडविणे, हीच खऱ्या अर्थाने डॉ. सुखात्मे यांना आदरांजली ठरेल.

तरुण भारत

# महावीर अध्यासनाला दिगे यांच्यातर्फे ५० हजारांची देणगी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील महावीर अध्यासनास धनंजय दिगे यांनी ५० हजारांचा देणगीचा धनादेश दिला. याप्रसंगी दिगे यांचा सत्कार करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत डॉ. विजय ककडे, जयदेव दिगे.

प्रतिनिधी

कोल्हापूर

विद्यापीठातील भगवान महावीर अध्यासनाच्या प्रस्तावित इमारतीसाठी धनंजय दिगे यांनी ५० हजार रूपये बृहत देणगी दिली आहे. या देणगीचा धनादेश कुलगुरूंकडे सुपूर्द करण्यात आला.

यावेळी दिगे यांचे नातू जयदेव दिगे उपस्थित होते. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते धनंजय दिगे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, डॉ. विजय ककडे आदी उपस्थित होते.

तरुण भारत

# विद्यापीठाचे ५८३ अभ्यासक्रमाचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठांर्गत मार्च–एप्रिल उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर ५८३ विषयांचे निकाल बुधवारी जाहीर झाले. यामुळे संबंधित विषयाच्या विद्यार्थ्यांचा पुढील शिक्षणाचा मार्ग मोकळा झाला. तसेच हवामान खात्याने अतिवृष्टीचा इशारा दिल्याने २७ रोजी होणाऱ्या सर्व अभ्यासक्रमाच्या परीक्षा स्थगित केल्या आहेत. या परीक्षांचे वेळापत्रक यथावकाश विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांची निवड

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागातील विद्यार्थी शिवानंद रुक्माणा कांबळे व रोहित दत्तात्रय नलवडे या दोघांची असिस्टंट केमिकल ॲनालायझर राजपत्रित अधिकारीपदी निवड झाली. नुकत्याच पार पडलेल्या महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत त्यांनी हे यश संपादन केले. त्यांना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांचे प्रोत्साहन लाभले. तसेच रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. के. डी. सोनवणे, डॉ. के. एम. गरडकर आदींचे मार्गदर्शन लाभले.

पुण्यनगरी

# दूरशिक्षणच्या विद्यार्थ्यांची आयटी कंपन्यांत निवड

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या एमबीए अभ्यासक्रमाच्या ३७ विद्यार्थ्यांची विविध आयटी कंपन्यांत निवड झाली. टाटा स्ट्राइव्ह आणि गुगल यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणारे विविध अभ्यासक्रम शिवाजी विद्यापीठातील सेंट्रल ट्रेनिंग आणि प्लेसमेंट सेलकडून सुरू केले होते. या अभ्यासक्रमासाठी दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातील एमबीए विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता.

लोकमत

# दूरशिक्षण केंद्राच्यावतीने सेवकांसाठी मार्गदर्शन

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाइन शिक्षण केंद्रामार्फत बी.ए., बी. कॉम., एम. ए. (मराठी हिंदी, इंग्रजी, इतिहास, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र व समाजशास्त्र) एम.कॉम., एम.एस्सी. (गणित) व एम.बी.ए. या अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया सुरू आहे.

या अनुषंगाने विद्यापीठातील सर्व प्रशासकीय सेवकांसाठी राजर्षी शाहू सभागृह येथे उद्बोधन वर्ग पार पडला. समन्वयक प्रा. डॉ.के.बी. पाटील यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. प्रवीण लोंढे यांनी प्रवेश प्रक्रियेतील ऑनलाइन अर्ज भरण्याबाबत प्रात्यक्षिक दाखविले.

समन्वयक डॉ.सी.ए. बंडगर, डॉ.पी.बी. बेळीकट्टी, बी.आर. पाटोळे, पी.एस. कांबळे, डी.पी. गावडे, डॉ.एस.व्ही. माने, व्ही.व्ही. वरुटे, व्ही.एम. मोहिते, डी.एस. करवडे, एस.एस. आडनाईक, पी.पी. जाधव उपस्थित होते. डी.के. कमलाकर यांनी प्रास्ताविक केले. डॉ.पी.एन. देवळी यांनी सूत्रसंचालन केले. डॉ.पी.पी. दावणे यांनी आभार मानले.

सकाळ

# विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील परीक्षा २० ऑक्टोबरपासून

## पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांचा समावेश

सकाळ वृत्तसेवा



कोल्हापूर, ता. २६ : शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील परीक्षांचा प्रारंभ २० ऑक्टोबरपासून होणार आहे. त्यात पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या ५५८ परीक्षांचा समावेश आहे. त्यांचे वेळापत्रक आज परीक्षा व मूल्यमापन मंडळाने जाहीर केले.

विद्यापीठाच्या सध्या मार्च-एप्रिल (उन्हाळी) सत्रातील परीक्षा सुरू आहेत. त्यामध्ये आजअखेर ५८३ अभ्यासक्रमांच्या परीक्षा होऊन त्यांचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत. अतिवृष्टीच्या इशारामुळे विद्यापीठाने आज आणि उद्या, गुरूवारच्या परीक्षा स्थगित केल्या आहेत.

उन्हाळी सत्रातील परीक्षा शुक्रवारपासून पूर्ववत सुरू होणार आहे. या सत्रातील शेवटची परीक्षा ९ ऑक्टोबर रोजी संपणार आहे. त्यानंतर हिवाळी सत्रातील परीक्षा २० ऑक्टोबरपासून सुरू होतील.

ऑक्टोबर-नोव्हेंबरमधील पदवी पारंपरिक अभ्यासक्रमाच्या प्रथम आणि द्वितीय वर्षाच्या परीक्षा तारखा परीक्षा मंडळाकडून लवकरच जाहीर केल्या जाणार आहेत. सर्व परीक्षांचे अर्ज भरण्याची तारीख आणि शुल्क जाहीर केले जाणार असल्याचे परीक्षा मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी सांगितले.

पुढारी

# विद्यापीठाच्या आजच्या परीक्षा स्थगित

कोल्हापूर : पूरस्थितीमुळे शिवाजी विद्यापीठाच्या मार्च, एप्रिल-२०२३ मधील पदवी व पदव्युत्तर विभागाच्या गुरुवारी (दि. २७) होणाऱ्या परीक्षा स्थगित करण्यात आल्या आहेत. विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षा दि. २५ मे पासून व्यवस्थितपणे सुरू आहेत. हवामान खात्याने दि. २६ व २७ जुलै रोजी शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या सांगली, सातारा व कोल्हापूर या तिन्ही जिल्ह्यांना अतिवृष्टीचा इशारा दिला आहे. दरम्यान, बुधवारी काही अभ्यासक्रमांचे निकाल घोषित करण्यात आले. आजअखेर ५८३ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित करण्यात आले आहेत.